सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा

### पुरातत्व व वस्तूसंग्रहालये विभाग

मु.पो. औंध, तालुका खटाव, जिल्हा सातारा, ४१५५१० e-mail id – aundhmuseum@gmail.com दूरध्वनी क्रमांक – (०२१६१) २६२२२५

जा.क्र.भसंग्रह/उपहारगृहदरपत्रकसूचना/२०२४/13 दिनांक – ०९/०१/२०२४

**दरपत्रक सूचना क्रमांक – ०१/२०२४**

**विषय :- श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथील संग्रहालयाच्या अधिकारी/कर्मचारी व संग्रहालय पहावयास येणाऱ्या प्रेक्षकांच्याकरिता अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरविण्यासाठी ऊपहारगृहाकरिता दरपत्रके मागविणेबाबत.**

श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथील संग्रहालयाच्या अधिकारी/कर्मचारी व संग्रहालय पहावयास येणाऱ्या प्रेक्षकांच्याकरिता अल्पोपहार व भोजन व्यवस्था इत्यादि पुरविण्याकरिता पात्र व्यक्ति/संस्थेकडून विहित नमुन्यात सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तसेच दरपत्रक सादर करण्याकरीताचे प्रपत्र (परिशिष्ट – १), कँटिन फॉर्म व नमुना अ श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा यांचे कार्यालयातून रु. ५००/- ला (अक्षरी रुपये पाचशे फक्त) विकत मिळतील.

| | | |
|---|---|---|
| 1. | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दिनांक २४ जानेवारी, २०२४ ते ३१ जानेवारी, २०२४ पर्यन्त |
| 2. | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३१ जानेवारी, २०२४, (दुपारी ४:०० वाजेपर्यंत) |
| 3. | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याची वेळ | सकाळी ११:०० ते ०४:०० वाजेपर्यंत (सोमवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) |
| 4. | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | ०१ फेब्रुवारी २०२४, रोजी सकाळी ११:०० वा. |
| 5. | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, तालुका खटाव, जिल्हा सातारा. ४१५ ५१०. |

दरपत्रक पाठवितांना तांत्रिक दरपत्रक व आर्थिक दरपत्रक वेगवेगळ्या लिफाफ्यामध्ये पाठवून त्यावर **"संग्रहालयासाठी उपहारगृह सेवा तसेच अल्पोपहार व भोजन व्यवस्था यांचे दरपत्रक"** असे नमूद करावे.

1. **लिफाफा क्रमांक – १ तांत्रिक दरपत्रक यामध्ये खालील प्रमाणे कागद पत्रे सादर करण्यात यावीत.**
    1. शॉप ॲक्ट लायसन्स/उद्यम रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट

Scanned with AnyScanner

2. ग्रामपंचायतीचा व्यवसायासाठीचा ना-हरकत प्रमाणपत्र दाखला
3. *Food Safety* and *Standards Act 2006* चे प्रमाणपत्र
4. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व जीएसटी भरण्याची पावती (लागू नसल्यास तसे शपथपत्र जोडावे)
5. उपहारगृह चालविण्याचा किमान १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र
6. आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत
7. कॅन्टीन फॉर्म
8. १०० रु च्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे ठेकेदाराचे स्वयंघोषणापत्र (नमुना अ)
9. राष्ट्रीयकृत बँकेचा सुरक्षा ठेव म्हणून रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चा D.D. **मा. उप-अभिरक्षक, श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा** यांच्या नावे सादर करणे अनिवार्य आहे.
10. खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल दरपत्रक सादर केल्याबाबचे हमीपत्र.

2. **लिफाफा क्रमांक – २ आर्थिक दरपत्रक यामध्ये विहित नमुन्यात (परिशिष्ट – १ नुसार) उपहारगृह सेवा तसेच अल्पोपहार व भोजन व्यवस्था इत्यादीचा दर नमुद करण्यात यावा.**

## उपहारगृह सेवा अटी व शर्ती

1. प्रस्तुत खाद्यपदार्थ पुरवठ्याच्या कराराचा **कालावधी तीन वर्षाचा** राहील. त्यापुढील कालावधीसाठी परवानाधारकाला उपहारगृह परवाना हा नूतनीकरण केल्याशिवाय चालू ठेवता येणार नाही.
2. अंतिम दिनांक व वेळेनंतरची तांत्रिक व आर्थिक दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
3. ज्या संस्थांना महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहार या कारणांसाठी अपात्र ठरविले आहे, अशा संस्थांना दरपत्रके भरता येणार नाहीत.
4. उपहारगृह ठेक्याची **सुरक्षा ठेव (Security Deposit) रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त)** इतकी आकारण्यात येईल. ठेका कालावधी संपल्यानंतर परवानाधारकास सुरक्षा ठेव म्हणून ठेवलेली रक्कम परत केली जाईल. परंतु कोणत्याही कारणास्तव झालेल्या नुकसानीची वसुली संबंधित सुरक्षा ठेव रकमेतून वसूल करण्यात येईल.
5. वरील प्रमाणे नमूद कागद पत्रांच्या पूर्ततेनंतरच सदर ठेका हा ग्राह्य धरला जाईल. जास्त रक्कम असलेली परंतु कागदपत्रे अपूर्ण असलेल्या ठेकेदारांच्या निविदेचा विचार केला जाणार नाही. परंतु त्यापेक्षा कमी रक्कम असलेली व या कार्यालयाने नमूद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या क्रमांक २ अथवा त्यानंतर येणाऱ्या निविदा धारकाच्या निविदेचा विचार या कार्यालय मार्फत केला जाईल**. या संबधी निविदा**

Scanned with AnyScanner

**स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्वाधिकार मा. उप-अभिरक्षक, श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा यांना राहील.**

6. उपहारगृह ठेका हा जास्त रकमेचे दरपत्रक असलेल्या व्यक्ति/संस्थेसच देण्यात येईल. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

7. उपहारगृह चालवण्यासाठीचा सेवा पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दहा दिवसांत उपहारगृह सुरू करणे बंधनकारक राहील.

8. काल्पनिक, संदिग्ध व सशर्त दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

9. उपहारगृहाची वेळ ही महाराष्ट्र शासनाने हॉटेल्स व रेस्टोरंट्स करिता निर्धारित केलेल्या वेळेस अनुसरूनच असेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. याबाबत शासनाने आखून दिलेल्या Guidelines चे उल्लंघन होत असल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास व दोनदा सूचना देऊनही Guidelines चे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास पुरवठादाराचा ठेका कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहितील.

10. संबंधित परवानाधारकाने चारित्र्य पडताळणी अहवाल (Police Verification) या कार्यालयास ठेका मिळाल्याच्या २ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

11. संबंधित परवानाधारकाने वैद्यकीय पडताळणी अहवाल (Medical Verification) या कार्यालयास ठेका मिळाल्याच्या २ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

12. या करारामध्ये नमूद केलेल्या सेवांचे वितरण करण्यासाठी परवानाधारक कोणत्याही उप-परवानाधारकास ठेवणार नाही.

13. परवानाधारकाने उपहारगृहाच्या अंतर्गत डिझाइनमध्ये कोणतेही बदल परस्पर करू नये. जर तसे आवश्यक असल्यास या कार्यालयास संबंधित बाबी कळवावे.

14. या कार्यालयामार्फत जागा, पाणी तसेच वॉटर प्युरिफायर यांचा पुरवठा केला जाईल. परंतु उपहारगृहाचे लाईट बिल भरणे संबंधित परवानाधारकास बंधनकारक राहील याची नोंद घेणे.

15. उपहारगृहामध्ये परवानाधारकास प्रथमोपचार किट ठेवणे व उपहारगृहाच्या गरजेनुरूप अग्निप्रतिबंधक उपाय योजना करणे संबंधित ठेकेदारास बंधनकारक असेल.

16. परवानाधारकास केवळ शुद्ध शाकाहारी खाद्यपदार्थ, जेवण, थंड पेय, चहा आणि कॉफी इत्यादींची विक्री करण्याची परवानगी दिली जाईल. तसेच अल्पोपहार, चहापान, भोजन तयार करतांना रंग, मसाले, खाद्यतेल व इतर साहित्य मान्यताप्राप्त व ISI प्रमाणित दर्जाचे वापरणे अनिवार्य राहील. अल्पोपहार, चहापान, भोजनानंतर कोणासही अन्न/चहापान बाधल्यामुळे काहीही त्रास झाल्यास त्यामुळे होणाऱ्या जीवित/आर्थिक/व्यवसायिक हानीस संबंधित पुरवठादार हेच जबाबदार राहतील. तसेच संबंधित बाधित व्यक्तींना द्यावयाची सर्व प्रकारची भरपाई ही पुरवठादारांनीच देणे बंधनकारक राहील. संचालक, पुरातत्व व

Scanned with AnyScanner

वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई व उप-अभिरक्षक, श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा याबाबत कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

17. उपहारगृह अथवा परिसरात मांसाहारी जेवण बनविण्यास सक्त मनाई असेल याची नोंद घेणे.
18. स्वयंपाक करण्यासाठी फक्त व्यावसायिक LPG गॅसचाच वापर करणे अनिवार्य राहील. केरोसीन अथवा कोळश्याचा वापर उपहारगृह परिसरात करू नये.
19. परवानाधारकाने तंबाखू, दारू व अन्य शासकीय बंदी असलेल्या पदार्थांची विक्री करता येणार नाही. असे आढळून आल्यास रु. ५००/- दंड अकरण्यात येईल व ते भरणे बंधनकारक राहील. असे कृत्य केल्यास उपहारगृह बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल व दुसऱ्या पुरवठादारास उपहारगृह चालविण्यास देण्यात येईल.
20. स्नॅक्स, मिठाई, दुपारचे भोजन व अन्य पदार्थ यांची विक्री रोख पेमेंटवर आधारित असेल. हे कार्यालय कुठल्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारच्या रकमेची भरपाई करण्यास जबाबदार राहणार नाही.
21. खाण्यापिण्याच्या वस्तूंचे दर हे उपहारगृहाच्या नोटिस बोर्डवर प्रदर्शित करणे परवानाधारकास बंधनकारक राहील.
22. मागणीनुसार ग्राहकांस बिल देणे परवानाधारकास बंधनकारक असेल.
23. खाद्यपदार्थ बनविण्याची परवानगी हि फक्त स्वयंपाकघरमध्ये राहील याची नोंद घ्यावी. तसेच संबंधित जागेचा वापर हा फक्त त्या कारणासाठीच करावा ज्या कारणासाठी हा ठेका मिळाला असेल. अन्य कोणत्याही कारणास्तव दुसऱ्या कामासाठी शासकीय उपहारगृहाचा/मालमत्तेचा उपयोग करू नये.
24. परवानाधारक स्वतःच्या खर्चाने क्रोकरी, स्वयंपाकघरातील भांडी इत्यादी खरेदी करेल. क्रोकरी आणि स्वयंपाक करण्यासाठी वापरली जाणारी भांडी मानक वॉशिंग पावडरचा वापर करून स्वच्छ ठेवली जातील यावर कटाक्षाने लक्ष देणे.
25. परवाना धारकाने किचन व उपहारगृह परिसरात योग्य ती स्वच्छता राखली पाहिजे. रोजच्या रोज गोळा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावून त्याचा निचरा करणे अत्यंत आवश्यक आहे. जर परवानाधारक स्वच्छता राखण्यात अयशस्वी झाल्यास परवानाधारकास दंड भरण्यास उत्तरदायी ठरवून त्याजकडून प्रतिमाह ५००/- इतका दंड घेण्यात येईल.
26. आवश्यकतेनुसार परवानाधारक देखभाल अथवा केटरिंग सेवांच्या कोणत्याही पैलू संबंधित या कार्यालयाने दिलेल्या सर्व सूचना पूर्ण करेल.
27. परवानाधारकाने जर उपहारगृह चालविण्याकरिता व सांभाळकरण्याकरिता कामगार ठेवल्यास त्याची माहिती या कार्यालयास देणे बंधनकारक राहील. तसेच त्या कामगाराची माहिती स्थानिक पोलिसांना कळविणे जरुरीचे राहील.

Scanned with AnyScanner

28. उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील. तसेच उपहारगृहात बाल कामगार कायद्यानुसार बाल कामगार ठेवता येणार नाही. याबाबत हे कार्यालय कोणत्याही परिस्थिती जबाबदार राहणार नाही.

29. परवानाधारक हा आपले संपूर्ण लक्ष खरेदी-विक्री, अन्न तयार करणे, पेये तयार करणे आणि या कराराच्या अंतर्गत येणाऱ्या आपल्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरीता आणि या कार्यालयाच्या पूर्ण समाधानास प्रामाणिकपणे पात्र ठरण्याकरिता कार्य करेल.

30. परवानाधारकाने पुरविलेल्या सेवेच्या गुणवत्तेबाबत काही तक्रारी आल्यास याबाबत निर्णय घेण्यासाठी संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे एकमेव प्राधिकरण असेल. तसेच पुरवठादाराकडून वरील प्रमाणे अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास व दोनदा सूचना देऊनही कामगिरी असंतोषजनक आढळल्यास पुरवठादाराचा ठेका कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहितील.

**दिनांक –** ०९ जानेवारी, २०२४

**ठिकाण –** औंध, सातारा

श्री भवानी चित्र संग्रहालय व ग्रंथालय
औंध
(सातारा)

श्री. उदय शं. सुर्वे,
(उप-अभिरक्षक),
श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय
औंध, सातारा

**प्रती**

संग्रहालय सूचना फलक, श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध, सातारा

**प्रत,**

मा. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहितीसाठी

Scanned with AnyScanner